# कार्यालय, नागपूर महानगरपालिका, नागपूर.
(शिक्षण विभाग)

जा.क्र. 1864/शि.वि./२०१५

दि 24/09/२०१५

प्रति,

मुख्याध्यापक/मुख्याध्यापीका,
सर्व प्राथ./उच्च प्राथ./माध्य. शाळा,
म.न.पा., नागपूर.

**विषय : अनूसुचित जमातीच्या (ST) विद्यार्थ्यांना शहरातील इंग्रजी माध्यमाच्या नामांकीत निवासी शाळेमध्ये इयत्ता १ ली व ५ वी मध्ये प्रवेश देणे व सन २०१५-१६ विद्यार्थ्यांची निवड करणेबाबत.**

**संदर्भ :** १.मा.जिल्हाधिकारी, नागपूर यांचे पत्र क्र.सामान्य/कक्ष'९/कावि-८०७/२०१५,दि.०५.०९.१५.
२.मा.आयुक्त तथा प्रादेशिक संचालक, नगरपरिषद प्रशासन, नागपूर यांचे पत्र क्र.एमयुन-१९ (१)सिआर-३/ कावि-४४१/२०१५, दि.१४.०८.१५
३.मा.अपर आयुक्त, आदिवासी विकास विभाग, नागपूर यांचे पत्र क्र.शाआशा-१५/प्र.क्र.२१६/का३(५)/४५, दि.०९.०६.२०१५.

उपरोक्त संदर्भिय विषयाचे अनुषंगाने कळविण्यात येते की, मा.मुख्यमंत्री महोदयांच्या अध्यक्षतेखाली दि.२३.०२.२०१५ रोजी आयोजित केलेल्या बैठकीत, अनुसूचित जमातीच्या विद्यार्थ्यांना सन २०१५-१६ या शैक्षणिक वर्षाकरीता शहरातील नामांकीत इंग्रजी माध्यमाच्या निवासी शाळांमध्ये शिक्षण देण्याकरीता इयत्ता १ ली व ५ वी या वर्गात प्रवेश देण्यास आदिवासी विकास विभागाव्दारा मान्यता प्रदान करण्यात आली आहे.

प्रस्तुत योजना आदिवासी विद्यार्थ्यांसाठी अत्यंत उपयूक्त असून त्याव्दारे नामांकीत इंग्रजी माध्यमाच्या शाळेंमध्ये आदिवासी विद्यार्थ्यांस भोजन व निवासासह इंग्रजी माध्यमातून दर्जेदार शिक्षणाची सोय उपलब्ध करून देण्यात येणार आहे. अशा शाळेतील प्रवेशाकरीता फक्त आदिवासी विद्यार्थी पात्र असून पालकांचे वार्षिक उत्पन्न रू. १.०० लक्ष इतके असणे आवश्यक आहे. या योजनेअंतर्गत आदिम जमातीच्या विद्यार्थ्यांची तसेच विधवा/घटस्फोटीत/निराधार/परित्यक्ता व दारिद्ररेषेखालील कुटूंब अनुसूचीत जमातीच्या विद्यार्थ्यांची प्राधान्याने निवड करून प्रवेशीत करण्यात येणार आहे.

यास्तव आपणांस कळविण्यात येते की, आपल्या शाळेमध्ये, परिसरात आणि नागपूर शहरामध्ये वास्तव्यास असलेल्या आदिवासी विद्यार्थ्यांना इयत्ता १ ली व ५ वी मध्ये इंग्रजी माध्यमाच्या नामांकीत निवासी शाळेमध्ये मोफत शिक्षणाची सोय उपलब्ध करून दयावयाची आहे. सदर योजनेचा लाभ आपल्या जिल्हयातील आदिवासी विद्यार्थ्यांना घेता यावा या दृष्टीने आपले स्तरावरून सदर योजनेचा प्रसार व प्रचार करून जास्तीजास्त आदिवासी विद्यार्थ्यांना उच्च शिक्षणाची सोय होण्याच्या दृष्टीने पालकांना व त्यांचे पाल्यास प्रवेशित करण्यास प्रवृत्त करण्याकरीता योग्य ते तातडीचे निर्देश देण्यात यावेत.

इंग्रजी माध्यमाच्या नामांकीत शाळेत इयत्ता १ ली व ५ वी मध्ये विद्यार्थी प्रवेश देण्याच्या अनुषंगाने प्रवेश फॉर्म संबंधीत प्रकल्प अधिकारी, एकात्मिक आदिवासी प्रकल्प, नागपूर यांचे कार्यालयात उपलब्ध आहेत.

शिक्षणाधिकारी
नागपूर महानगरपालिका, नागपूर.

प्रतिलीपी,

१. मा.आयुक्त तथा प्रादेशिक संचालक, नगरपरिषद प्रशासन, नागपूर यांना माहितीस्तव सादर
२. मा.अपर आयुक्त, आदिवासी विकास विभाग, नागपूर विभाग, नागपूर यांना माहितीस्तव सादर
३. मा.जिल्हाधिकारी, नागपूर.

PC:3/C:/SRW/letter.doc

अ.शा. पत्र क्र.आआ/१५/प्र.क्र.२१६/का ३(९) ४१

अपर आयुक्त यांचे कार्यालय
आदिवासी विकास, नागपूर
दिनांक :- ०९/०६/२०१५

विभागीय आयुक्त कार्यालय नागपूर
16 JUN 2015
122

डॉ. माधवी खोडे, भा.प्र.से.
अपर आयुक्त

विषय :- **अनुसूचित जमातीच्या विद्यार्थ्यांना शहरातील इंग्रजी माध्यमाच्या नामांकित निवासी शाळेमध्ये इयत्ता १ ली व ५ वी मध्ये प्रवेश देणे. (सन २०१५-१६) विद्यार्थ्यांची निवड करणे.**

प्रिय

उपरोक्त विषयाचे अनुषंगाने कळविण्यात येते की, मा. मुख्यमंत्री महोदयांच्या अध्यक्षतेखाली दिनांक २३.२.२०१५ रोजी घेतलेल्या बैठकीत, अनुसूचित जमातीच्या विद्यार्थ्यांना सन २०१५-१६ या शैक्षणिक वर्षाकरीता शहरातील नामांकित इंग्रजी माध्यमाच्या निवासी शाळांमध्ये शिक्षण देण्याकरीता इयत्ता १ ल्या व ५ व्या वर्गात प्रवेश देण्यास आदिवासी विकास विभागाद्वारे मान्यता प्रदान करण्यात आली आहे. मा. मुख्यमंत्री महोदयांनी दिलेल्या निर्देशानुसार राज्याकरीता २५००० विद्यार्थ्यांचा लक्षांक ठरवून दिले आहे. त्याअनुषंगाने नागपूर विभागाकरीता सदर योजनेअंतर्गत प्रती प्रकल्प १००० या प्रमाणे **एकूण ८००० विद्यार्थी प्रवेशाचे** शासनाद्वारे लक्षांक ठरविण्यात आले आहे.

प्रस्तुत योजना आदिवासी विद्यार्थ्यांसाठी अत्यंत उपयुक्त असुन त्याद्वारे नामांकित इंग्रजी माध्यमाच्या शाळेमध्ये आदिवासी विद्यार्थ्यास भोजन व निवासासह इंग्रजी माध्यमातून दर्जेदार शिक्षणाची सोय उपलब्ध करुन देण्यात येणार आहे. या शाळेतील प्रवेशाकरीता फक्त आदिवासी विद्यार्थी पात्र असून पालकाचे वार्षीक उत्पन्न रु. १.०० लक्ष इतके असणे आवश्यक आहे. या योजनेअंतर्गत आदिम जमातीच्या विद्यार्थ्यांची तसेच विधवा / घटस्फोटीत / निराधार / परित्यक्ता व दारिद्र्यरेषेखालील कुटंब अनुसूचित जमातीच्या विद्यार्थ्यांची प्राधान्याने निवड करुन प्रवेशीत करण्यात येणार आहे. सदर योजनेच्या अटी व शर्ती या सोबत संलग्न करण्यात येत आहे.

यास्तव आपणास विनंती की, **आपल्या अधिनस्त महानगर पालीकेच्या शाळेमध्ये शैक्षणिक सत्र २०१४-१५ मध्ये इयत्ता ४ थी मधून पास झालेले आदिवासी विद्यार्थी तसेच नागपूर शहरामध्ये वास्तव्यास असलेल्या आदिवासी विद्यार्थ्यांना इयत्ता १ ली व ५ वी मध्ये इंग्रजी माध्यमाच्या नामांकित निवासी शाळेमध्ये मोफत शिक्षणाची सोय उपलब्ध करुन दयावयाचे आहे.** सदर योजनेचा नागपूर शहरातील आदिवासी विद्यार्थ्यांना लाभ घेता यावा यादृष्टीने आपण आपल्यास्तरावरुन सदर योजनेचा प्रसार व प्रचार करुन जास्तीत जास्त आदिवासी विद्यार्थ्यांना उच्च शिक्षणाची सोय होण्याच्या दृष्टीने पालकांना त्यांचे पाल्यास प्रवेशीत करण्याकरीता प्रवृत्त करावे. यावावत आपल्यास्तरावरुन महानगर पालीकेतील संबंधीत अधिकारी यांना योग्य ते तातडीचे निर्देश आपल्यास्तरावरुन देण्यात यावेत.

इंग्रजी माध्यमाच्या नामांकित शाळेत इयत्ता १ ली व ५ वी मध्ये विद्यार्थी प्रवेश करण्याचे अनुषंगाने प्रवेश फार्म संबंधीत प्रकल्प अधिकारी, एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प, नागपूर याचे कार्यालयास उपलब्ध आहे. सुलभ संदर्भाकरीता नमुना फार्म या सोबत जोडण्यात येत आहे.

**आदिवासी मुलांना मुख्य प्रवाहात आणण्यासाठी जे स्वप्न शासन व प्रशासन बघत आहे. त्याची स्वप्नपूर्ती करताना आपण आयुक्त म्हणून केलेल्या समन्वयास मी आपली आभारी राहीन.**

आपली
स्वा/-
**(डॉ.माधवी खोडे)**

प्रति,
**श्री. श्रावण हर्डीकर, भा.प्र.से.**
आयुक्त,
महानगर पालीका, नागपूर

**प्रतिलिपी यांना माहितीस्तव सविनय सादर-**

१. मा. प्रधान सचिव, आदिवासी विकास विभाग, मंत्रालय मंबई-३२
२. मा. विभागीय आयुक्त, नागपूर विभाग, नागपूर.
३. मा. आयुक्त, आदिवासी विकास, म. रा. नाशिक.

प्रत :- प्रकल्प अधिकारी, एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प, नागपूर यांना सुचित करण्यात येते की, लक्षांक पूर्ण करणेसाठी तातडीने कार्यवाही करुन लक्षांक पूर्ण करण्यात यावे.

अपर आयुक्त
आदिवासी विकास, नागपूर